**प्रसिद्धी पत्रक** ०३ फेब्रुवारी, २०१५

# वर्तमान आमदारांच्या निवडणुकीतील खर्चाच्या हिशेबाचे विश्लेषण

## महाराष्ट्र विधानसभा निवडणूक, २०१४

जनप्रतिनिधित्व कायदा, १९५१ च्या कलम ७८ नुसार प्रत्येक राज्यामध्ये किंवा केंद्रशासित प्रदेशामध्ये निवडणुकीत भाग घेणा-या प्रत्येक उमेदवाराला निवडणुकीचा निकाल घोषित झाल्याच्या दिवसापासून ३० दिवसांचे आत आपापल्या जिल्हा निवडणूक अधिका-यांकडे निवडणुकीच्या खर्चाचा हिशेब सादर करणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र इलेक्शन वॉच (एमईडब्ल्यू) आणि असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स (एडीआर) यांनी २०१४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांनंतर सर्व २८८ आमदारांनी सादर केलेल्या निवडणुकीतील खर्चाच्या हिशेबांचे विश्लेषण केले. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील खर्चाची कमाल मर्यादा रु.२८ लाख इतकी होती. निवडणुकीतील खर्चाच्या या ताळेबंदामध्ये *सार्वजनिक बैठका आणि मिरवणुका, इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट मिडीयाद्वारे होणारा प्रचार, प्रचारकांवर होणारा खर्च, प्रचारात वापरल्या जाणा-या गाड्यांचा खर्च तसेच प्रचार साहित्याचा खर्च* मोजला गेलेला आहे.

शिफारसी:

१. प्रत्येक उमेदवाराला निवडणुकीचा निकाल घोषित झाल्याच्या दिवसापासून ३० दिवसांच्या आत निवडणुकीत झालेल्या खर्चाचा ताळेबंद सादर करावा लागतो. त्यानंतर हे ताळेबंद मिळाल्यापासून ७२ तासांच्या आत मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केले जातात. महाराष्ट्रातील निवडणुकांचे निकाल दि.१९ ऑक्टोबर, २०१४ रोजी घोषित झाले आणि उमेदवारांनी खर्चाचा ताळेबंद सादर करण्याची मुदत १८ नोव्हेंबर, २०१४ पर्यंत होती. पण असे आढळून आले की, बहुतेक उमेदवारांनी सादर केलेले ताळेबंद ही मुदत संपल्यावर पण मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित

केला गेला नाही. म्हणून एमईडब्ल्यू/एडीआर अशी सूचना देऊ इच्छितात की, उमेदवारांनी सादर केलेला खर्चाचा ताळेबंद (पुरवणी १५) हा मिळाल्यापासून ७२ तासांच्या आत मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात यावा.

२. निवडणुकीसंबंधी एखाद्या उमेदवाराविरुद्ध दावा दाखल करण्याची मुदत निवडणुकीचे निकाल घोषित झाल्याच्या दिवसांपासून ४५ दिवस इतकी आहे. उमेदवार सहसा त्यांना असलेल्या ३० दिवसांच्या मुदतीच्या शेवटी शेवटी ताळेबंद सादर करतात. त्यामुळे कुठल्याही उमेदवाराच्या विरुद्ध दावा दाखल करण्यासाठी सामान्य नागरिकाच्या हातात फक्त १५ दिवस उरतात. म्हणून निवडणुकीसंबंधी दावे दाखल करण्यासाठीची मुदत वाढवण्यात यावी जेणेकरून सामान्य नागरिकांना उमेदवारांनी दाखल केलेल्या हिशेबाच्या फेरतपासणीकरिता तसेच संबंधित कागदपत्रे/पुरावे गोळा करण्याकरिता पुरेसा अवधी मिळेल.


३. निवडणुकीदरम्यान सादर करावयाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे उमेदवाराने खर्चाच्या ताळेबंदामधील (पुरवणी १५) तसेच गट १ ते ९ मधील कुठलाही रकाना रिकामा सोडता कामा नये. ताळेबंद सुवाच्य अक्षरात लिहीलेला असावा आणि त्यातील रकमांमध्ये कसल्याही प्रकारच्या खाडाखोडीला मज्जाव केला जावा.

## महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४ मधील आमदारांच्या निवडणूक खर्चाच्या ताळेबंदांचा संक्षेप आणि त्यातील महत्वाचे मुद्दे

१. ***निर्धारित मर्यादेच्या ५०% पेक्षा कमी:*** उमेदवार नेहेमीच तक्रार करत असतात की, खर्चाची मर्यादा खूपच कमी आहे. पण ज्या २८८ आमदारांनी भारतीय निवडणूक आयोगाला महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४ मधील खर्चाचा ताळेबंद सादर केला आहे त्याच्या विश्लेषणावरून असे दिसते की, **१२० आमदारांनी (४२%)** त्यांच्या विधानसभा मतदारसंघात **कमाल मर्यादेच्या ५०% पेक्षाही कमी खर्च केल्याचे नमूद केले आहे.**

२. ***सरासरी निवडणूक खर्च:*** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४ तील २८८ आमदारांनी भारतीय निवडणूक आयोगाला सादर केलेल्या खर्चाच्या ताळेबंदांच्या आधारे असे दिसून येते की, त्यांनी **निवडणुकीसाठी खर्च केलेली सरासरी रक्कम ही फक्त रु. १५.१८ लाख** इतकी आहे जे **कमाल मर्यादेच्या अवघी ५४%** आहे.


३. ***पक्षानुसार सरासरी निवडणूक खर्च:*** पक्षानुसार सरासरी निवडणूक खर्च असे दर्शवतो की, **भाजपच्या १२२ आमदारांचा सरासरी खर्च रु. १५.३२ लाख (कमाल मर्यादेच्या ५५%)** इतका आहे, **काँग्रेस (आय) च्या ४२ आमदारांचा सरासरी खर्च रु. १५.२५ लाख (कमाल मर्यादेच्या ५४%)** इतका आहे, **शिवसेनेच्या ६३ आमदारांचा सरासऱी खर्च रु. १३.४२ लाख (कमाल मर्यादेच्या ४८%)** इतका आहे तर **राष्ट्रवादी काँग्रेसच्या ४१ आमदारांचा सरासरी खर्च रु. १७.७७ लाख (कमाल मर्यादेच्या ६३%)** इतका आहे.




**आकृती १: पक्षानुसार सरासरी निवडणूक खर्च (लाखांमध्ये)**

४. <u>सगळ्यात जास्त खर्च करणा-यांमधील पहिले ३ आमदार</u>: सगळ्यात जास्त खर्च रु, २६.१९ लाख (कमाल मर्यादेच्या ९४%) दाखवला आहे बच्चू उर्फ ओमप्रकाश बाबाराव कडू या अचलपूर मतदारसंघातील अपक्ष उमेदवाराने. त्याखालोखाल आहेत ओवळा माजीवाडा मतदारसंघातील शिवसेनेचे प्रताप बाबुराव सरनाईक. त्यांनी रु. २५.६१ लाख (कमाल मर्यादेच्या ९१%) इतका खर्च दाखवला आहे. तिस-या क्रमांकावर आहेत कोरेगाव मतदारसंघातील भाजपच्या स्नेहलता बिपिनदादा कोल्हे ज्यांनी रु.२४.८६ लाख (कमाल मर्यादेच्या ८९%) इतका खर्च दाखवला आहे.

५. ***सगळ्यात कमी निवडणूक खर्च दाखवणारे आमदार:*** **ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुसलमीन** पक्षाचे भायखळा मतदारसंघातील **ॲड. वारिस युसुफ पठान** यांनी सगळ्यात कमी म्हणजे **रु. २.७६ लाख** इतका खर्च दाखवला आहे. त्याखालोखाल गोंदिया मतदारसंघातील **काँग्रेस (आय) चे गोपालदास शंकरलाल *अग्रवाल* यांनी रु. ५.४६ लाख** इतका खर्च दाखवला आहे तर पेण मतदारसंघातील **भारतीय शेतकरी व कामगार पक्षाचे (शेकाप) धैरशील मोहन पाटील यांनी रु. ५.६५ लाख** इतका खर्च दाखवला आहे.




आकृती २: आमदारांना आलेल्या निवडणूक खर्चाची वर्गवारी

६. ***स्टार प्रचारकासोबत होणा-या सार्वजनिक बैठका, मेळावे आणि मिरवणुका यांवर होणारा खर्च:*** विश्लेषण केलेल्या २८८ आमदारांपैकी **७८ आमदारांनी (२७%)** स्टार प्रचारकासोबत होणा-या सार्वजनिक सभा, मिरवणुका इत्यादींवर **काहीही खर्च न केल्याचे** दाखवले आहे.

७. ***स्टार प्रचारकाविना होणा-या सार्वजनिक सभा, मेळावे आणि मिरवणुका इत्यादींवर होणारा खर्च:*** विश्लेषण केलेल्या २८८ आमदारांपैकी **८ आमदारांनी (३%)** स्टार प्रचारकाविना होणा-या सार्वजनिक सभा, मेळावे आणि मिरवणुका इत्यादींवर **काहीही खर्च न केल्याचे** दाखवले आहे.


८. ***इलेक्ट्रॉनिक/प्रिंट मिडीयाद्वारे प्रचारावर होणारा खर्च:*** **४९ आमदारांनी (१७%)** दर्शविले आहे की, त्यांनी इलेक्ट्रॉनिक/प्रिंट मिडीयाच्या माध्यमातून प्रचारावर **काहीही खर्च केलेला नाही**.

९. ***प्रचारकांवर होणारा खर्च:*** **४८ आमदारांनी (१७%)** दर्शविले आहे की, त्यांनी **प्रचारकांवर कसलाही खर्च केलेला नाही**.

१०. ***गाड्यांवर होणारा खर्च:*** **४ आमदारांनी (१%)** दर्शविले आहे की, त्यांच्या **गाड्यांच्या वापरावर कसलाही खर्च केलेला नाही**.


११. ***प्रचारसाहित्यावर होणारा खर्च:*** **२० आमदारांनी (७%)** दर्शविले आहे की, त्यांनी **प्रचारसाहित्यावर कसलाही खर्च केलेला नाही**.

***१२. स्टार प्रचारकांसोबत होणा-या सार्वजनिक सभा, मिरवणुकांवर होणारा पक्षानुसार खर्च:***





**आकृती ३: स्टार प्रचारकासोबत होणा-या सार्वजनिक सभा, मिरवणुकांवर होणारा पक्षनियाह खर्च (लाखांमध्ये)**

### १३. *स्टार प्रचारकांविना होणा-या सार्वजनिक सभा, मिरवणुकांवर होणारा पक्षानुसार खर्च:*





आकृती ४: *स्टार प्रचारकांविना* होणा-या सार्वजनिक सभा, मिरवणुकांवर होणारा पक्षानुसार खर्च (लाखांमध्ये)

१४. ***प्रचारसाहित्यावर पक्षानुसार होणारा सरासरी खर्च:***





**आकृती ५: प्रचारसाहित्यावर पक्षानुसार होणारा सरासरी खर्च**

१५. ***इलेक्ट्रॉनिक मिडीयावर पक्षानुसार होणारा सरासरी खर्च:***





**आकृती ६: इलेक्ट्रॉनिक मिडीयावर पक्षानुसार होणारा सरासरी खर्च (लाखांमध्ये)**

१६. ***प्रचारातील गाड्यांवर पक्षानुसार होणारा सरासरी खर्च:***




**आकृती ७: प्रचारातील गाड्यांवर पक्षानुसार होणारा सरासरी खर्च (लाखांमध्ये)**

१७. ***प्रचारकांवर पक्षानुसार होणारा सरासरी खर्च:***





**आकृती ८: प्रचारकांवर पक्षानुसार होणारा सरासरी खर्च (लाखांमध्ये)**

१८. ***राजकीय पक्षांकडून उभारलेला निधी:*** विश्लेषण केलेल्या २८८ आमदारांपैकी **२२६ आमदारांनी (७८%)** दर्शविले आहे की, त्यांना **राजकीय पक्षाकडून कुठल्याही निधी मिळालेला नाही**.

१९. ***एखादी व्यक्ती/कंपनी/संस्था/मंडळ/समिती इत्यादींकडून मिळालेली कर्ज/भेट/वर्गणी इत्यादींची रक्कम:*** विश्लेषण केलेल्या २८८ आमदारांपैकी **१२० आमदारांनी (४२%)** दर्शविले आहे की, त्यांना **कुठल्याही व्यक्ती/कंपनी/संस्था/मंडळ/समिती इत्यादींकडून कसलीही रक्कम कर्ज/भेट/वर्गणी म्हणून मिळालेली नाही.**

२०. ***निवडणूक प्रचारासाठी स्वतःचा निधी:*** विश्लेषण केलेल्या २८८ आमदारांपैकी **१२ आमदारांनी (४%)** दर्शविले आहे की, त्यांनी **स्वतःच्या खिशातून निवडणूक प्रचारासाठी निधी उभारला नाही**.





आकृती ९: आमदारांनी निधी उभारलेल्या स्त्रोतांची वर्गवार विभागणी

२१. ***राजकीय पक्षाकडून उभारलेला सरासरी निधी (पक्षानुसार):***
सरासरी पाहता **भाजपमधील १६% आमदारांनी** त्यांच्या निवडणूक प्रचाराचा निधी पक्षाकडून उभारला. त्याचप्रमाणे **काँग्रेस (आय) मधील २४% आमदारांनी व राकाँपमधील ९% आमदारांनी** त्यांच्या निवडणूक प्रचाराचा निधी त्यांच्या पक्षाकडून उभारला तर **शिवसेनेतील १% आमदारांनी** त्यांच्या **निवडणूक प्रचाराचा निधी त्यांच्या पक्षाकडून उभारला**.

२२. ***एखादी व्यक्ती/कंपनी/संस्था/मंडळ/समिती इत्यादींकडून कर्ज/भेट/वर्गणी इत्यादी माध्यमातून उभारलेला निधी (पक्षानुसार):*** सरासरी पाहता **भाजपच्या २६% आमदारांनी** त्यांच्या निवडणूक प्रचाराचा निधी एखादी व्यक्ती/कंपनी/संस्था/मंडळ/समिती इत्यादींकडून मिळालेल्या कर्ज/भेट/वर्गणी इत्यादींच्या माध्यमातून उभारला. **शिवसेनेच्या ४३% आमदारांनी**, **काँग्रेस (आय)च्या १८% आमदारांनी** तर **राकाँपच्या १९% आमदारांनी** त्यांच्या **निवडणूक प्रचाराचा निधी एखादी व्यक्ती/कंपनी/संस्था/मंडळ/समिती इत्यादींकडून मिळालेल्या कर्ज/भेट/वर्गणी इत्यादींच्या माध्यमातून उभारला.**

२३. ***स्वतःचा निधी वापरण्याची सरासरी (पक्षानुसार):*** सरासरी पाहता **भाजपच्या ४४% आमदारांनी** त्यांच्या निवडणूक प्रचाराचा निधी स्वतःच्या खिशातून उभारला. त्याचप्रमाणे **शिवसेनेच्या ५७% आमदारांनी** त्यांच्या निवडणूक प्रचाराचा निधी स्वतःच्या खिशातून उभारला. **काँग्रेस (आय)मधील ५९% आमदारांनी** तर **राकाँपमधील ७२% आमदारांनी** त्यांच्या **निवडणूक प्रचाराचा निधी स्वतःच्या खिशातून उभारला.**




आकृती १०: आमदारांसाठी निधी उभारलेले स्त्रोत (पक्षानुसार)

# <u>महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४ मधील मंत्र्यांच्या निवडणूक खर्चाचा आढावा आणि त्यातील कळीचे मुद्दे</u>

१. ***कमाल मर्यादेच्या ५०% पेक्षा कमी:*** २०१४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीनंतर भारतीय निवडणूक आयोगाकडे जमा झालेल्या खर्चाच्या २२ मंत्र्यांच्या ताळेबंदांचे विश्लेषण केले असता असे आढळून आले की, त्यातील **१० मंत्र्यांनी (४५%)** आपापल्या मतदारसंघात त्यांचा **निवडणुकीवरील खर्च कमाल मर्यादेच्या ५०% पेक्षा कमी** झाल्याचे नमूद केले आहे.

२. ***निवडणुकीचा सरासरी खर्च:*** २०१४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीनंतर भारतीय निवडणूक आयोगाकडे जमा झालेल्या खर्चाच्या २२ ताळेबंदांचे विश्लेषण केले असता असे आढळून आले की, त्यातील आमदारांचा निवडणूक प्रचारासाठी झालेला **सरासरी खर्च हा रु. १४.९० लाख** इतका आहे जो **कमाल मर्यादेच्या ५३%** आहे.

३. ***सगळ्यात जास्त खर्च दाखवणारे पहिले ३ मंत्री:*** सगळ्यात जास्त खर्च **रु. २४.०५ लाख (कमाल मर्यादेच्या ८६%)** दाखवला आहे अहेरी मतदारसंघातील भाजपच्या **अंबरीषराव राजे सत्यवानराव अत्राम** यांनी. त्यानंतर आहेत बल्लारपूर मतदारसंघातील भाजपचे **सुधीर मुनगंटीवार** ज्यांनी **रु. २२.९९ लाख (कमाल मर्यादेच्या ८२%)** इतका खर्च दाखवला आहे. तिस-या क्रमांकावर आहेत कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातील शिवसेनेचे **एकनाथ संभाजी शिंदे** ज्यांनी **रु. २०.७६ लाख (कमाल मर्यादेच्या ७४%)** खर्च दाखवला आहे.

४. ***सगळ्यात कमी खर्च दाखवणारे मंत्री:*** मालेगाव मतदारसंघातील शिवसेनेचे **दादाजी दगडू भुसे** यांनी सगळ्यात कमी म्हणजे **रु. ८.७८ लाख (कमाल मर्यादेच्या ३१%)** इतका खर्च दाखवला आहे. त्यानंतर आहेत विक्रमगड मतदारसंघातील भाजपचे **सावरा विष्णू राम** ज्यांनी **रु. ९.०७ लाख (कमाल मर्यादेच्या ३२%)** इतका खर्च दाखवला आहे. त्याखालोखाल आहेत दिगरस मतदारसंघातील शिवसेनेचे **राठोड संजय दुलीचंद** आणि नागपूर दक्षिण-पश्चिम मतदारसंघातील भाजपचे **देवेंद्र फडणवीस** ज्यांनी अनुक्रमे **रु. ११.०२ लाख (कमाल मर्यादेच्या ३९%)** आणि **रु. ११.४१ लाख (कमाल मर्यादेच्या ४१%)** इतका खर्च दाखवला आहे.

५. ***<u>स्टार प्रचारकांसोबत सार्वजनिक सभा, मिरवणुका इत्यादींवर होणारा खर्च:</u>*** विश्लेषण केलेल्या २२ मंत्र्यांपैकी **३ मंत्र्यांनी (१४%)** दर्शविले आहे की, त्यांनी अशा प्रकारचा **कोणताही खर्च केलेला नाही.**


६. ***<u>स्टार प्रचारकांविना सार्वजनिक सभा, मिरवणुका इत्यादींवर होणारा खर्च:</u>*** विश्लेषण केलेल्या २२ मंत्र्यांपैकी **१ मंत्र्याने**, दिगरस मतदारसंघातील राठोड संजय दुलीचंद यांनी, असे दर्शविले आहे की, त्यांनी अशा प्रकारचा **कोणताही खर्च केलेला नाही.**

७. ***<u>इलेक्ट्रॉनिक/प्रिंट मिडीयाद्वारे प्रचारावर होणारा खर्च:</u>*** **६ मंत्र्यांनी (२७%)** असे दर्शविले आहे की, त्यांनी **इलेक्ट्रॉनिक/प्रिंट मिडीयावर कोणताही खर्च केलेला नाही.**

८. ***<u>प्रचारकांवर होणारा खर्च:</u>*** **४ मंत्र्यांनी (१८%)** असे दर्शविले आहे की, त्यांनी **प्रचारकांवर कोणताही खर्च केलेला नाही.**

९. ***<u>गाड्यांच्या वापरावर होणारा खर्च:</u>*** सगळ्याच मंत्र्यांनी गाड्यांवर खर्च दाखवलेला आहे ज्यापैकी जोगेश्वरी (पूर्व) मतदारसंघातील शिवसेनेचे **रविंद्र दत्ताराम वाईकर** यांनी सगळ्यात कमी म्हणजे **रु. ५०,०९८ (कमाल मर्यादेच्या ४%)** इतका खर्च दाखवला आहे.

१०. ***<u>प्रचारसाहित्यावर होणारा खर्च:</u>*** **३ मंत्र्यांनी (१४%)** प्रचार साहित्यावर **कसलाही खर्च न झाल्याचे दर्शविले आहे.**





**आकृती ११: मंत्र्यांनी दाखवलेल्या खर्चाची वर्गवार विभागणी**

११. ***<u>राजकीय पक्षाद्वारे उभारलेला निधी:</u>*** विश्लेषण केलेल्या २२ मंत्र्यांपैकी **१२ मंत्र्यांनी (५५%)** त्यांना त्यांच्या **राजकीय पक्षांकडून कसलाही निधी न मिळाल्याचे दर्शवले आहे.**

१२. ***<u>एखादी व्यक्ती/कंपनी/संस्था/समिती/मंडळ यांच्याकडून कर्ज, भेट किंवा वर्गणीद्वारे मिळालेला निधी:</u>*** विश्लेषण केलेल्या २२ मंत्र्यांपैकी **११ मंत्र्यांनी (५०%)** दर्शविले आहे की, त्यांना कुठल्याही व्यक्ती/कंपनी/संस्था/समिती/मंडळ यांच्याकडून कर्ज, भेट किंवा वर्गणीद्वारे कसलाही निधी मिळालेला नाही.

१३. ***<u>निवडणूक प्रचारासाठी वापरलेला स्वतःचा निधी:</u>*** विश्लेषण केलेल्या २२ मंत्र्यांपैकी **१ मंत्र्याने**, पुणे कँट. मतदारसंघातील **दिलीप कांबळे** यांनी, असे दर्शवले आहे की त्यांनी निवडणूक प्रचारासाठी **स्वतःच्या खिशातून कसलाही खर्च केलेला नाही**.




**आकृती १२: मंत्र्यांनी उभारलेल्या निधीच्या स्त्रोतांची वर्गवार विभागणी**

# संपर्क

## महाराष्ट्र इलेक्शन वॉच



| | | |
|---|---|---|
| अजित रानाडे<br>+९१-९७०२२ १५३१२<br>ajit.ranade@gmail.com | शरद कुमार<br>+९१-९८६९४ ०३७२१<br>sharadkumar40@gmail.com | दीपक नेगी<br>+९१-९८९२४ ०३१८६<br>deepak@adrindia.org |



## नॅशनल ईलेक्शन वॉच / असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स



| | | | |
|---|---|---|---|
| मिडीया आणि पत्रकारांसाठी हेल्पलाईन<br><br>+९१ ८०१०३ ९४२४८<br>ईमेल: adr@adrindia.org | मेजर जनरल अनिल वर्मा (सेवानिवृत्त)<br>प्रमुख<br>नॅशनल ईलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>०११ ४१६५ ४२००<br>+९१ ८८२६४ ७९९१०<br>adr@adrIndia.org,<br>anilverma@adrindia.org | प्रा. जगदीप चोक्कर<br>आयआयएम अहमदाबाद (सेवानिवृत्त)<br>संस्थापक सदस्य,<br>नॅशनल ईलेक्शन वॉच, असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१ ९९९९६ २०९४४<br>jchhokar@gmail.com | प्रा. त्रिलोचन शास्त्री<br>आयआयएम बॅंगलोर<br>संस्थापक सदस्य,<br>नॅशनल ईलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१ ९४४८३ ५३२८५<br>trilochans@iimb.ernet.in |



## डिसक्लेमर

आमदारांबद्दल या अहवालात असलेली सगळी माहिती ही त्यांनी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्याकडे दाखल केलेल्या निवडणूकीतील खर्चाच्या ताळेबंदांमधून घेतलेली आहे. **निवडणूक आयोगाने माहितीमध्ये काही बदल केल्याशिवाय एडीआर उपरोक्त माहितीमध्ये कसलेही कमी-अधिक बदल करत नाही. विशेष करून इतर कुठल्याही स्त्रोताकडून मिळालेली अप्रमाणित माहिती अजिबात वापरली जात नाही.** प्रतिज्ञापत्रांच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या संकेतस्थळावरून (http://103.23.150.139/VSAffidavits/VS2014Exp.aspx) मिळवलेले आहेत. सगळी माहिती निवडणूकीतील खर्चाच्या ताळेबंदाबरहुकूम ठेवली जावी यासाठी जरी सर्वतोपरी प्रयत्न केले असले तरी या अहवालातील माहिती आणि निवडणुकीतील खर्चाचे ताळेबंद यामधील माहितीमध्ये काही विसंगती आढळल्यास निवडणुकीतील खर्चाच्या ताळेबंदातील माहिती बरोबर मानावी. प्रकाशनाच्या प्रक्रियेदरम्यान या अहवालामध्ये काही दोष निर्माण झाल्यास त्यासाठी असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स, महाराष्ट्र ईलेक्शन वॉच आणि त्यांचे स्वयंसेवक कुठल्याही प्रकारे जबाबदार असणार नाहीत.